बौद्ध विवाह संस्कार विधी

पंचांग प्रणाम (पाली)

अरहं संम्मा संबूद्धो, भगवा बुद्धं, भगवंतं, अभिवादेमी ।

स्वाक्खातो भगवता धम्मो, धम्मं नमस्वामि ।

सुपटिपन्नो भगवतो सावक संघॊ, संघं नमामि ।

पंचांग प्रणाम (मराठी)

जिवनमुक्त असलेले संम्यक संबुद्ध अशा भगवान बुद्धाला मी अभिवादन करतो.

भगवंताच्या पवित्र मुख्य धंम्माला मी नमस्कार करतो.

भगवंताच्या सुमार्गावर आरूढ असलेल्या संघास मी नमस्कार करतो.

बुद्ध वंदन (पाली)

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बबुध्दस्स ।

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बबुध्दस्स ।

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बबुध्दस्स ।

बुद्ध वंदन (मराठी)

त्या भगवान बुद्धांना माझे वंदन असो, जे अहर्त, जीवन मुक्त, सम्यक सम्बुद्ध व संपूर्ण जागृत आहेत. || १ ||

त्या भगवान बुद्धांना माझे वंदन असो, जे अहर्त, जीवन मुक्त, सम्यक सम्बुद्ध व संपूर्ण जागृत आहेत. || २ ||

त्या भगवान बुद्धांना माझे वंदन असो, जे अहर्त, जीवन मुक्त, सम्यक सम्बुद्ध व संपूर्ण जागृत आहेत. || ३ ||

तीन अनुसरणे (पाली)

बुद्धं सरणं गच्छामि ।

धम्मं सरणं गच्छामि |

संघं सरणं गच्छामि |

दुतियम्पि बुद्धं सरणं गच्छामि |

दुतियम्पि धम्मं सरणं गच्छामि |

दुतियम्पि संघं सरणं गच्छामि |

ततियम्पि बुद्धं सरणं गच्छामि |

ततियम्पि धम्मं सरणं गच्छामि |

ततियम्पि संघं सरणं गच्छामि |

तीन अनुसरणे (मराठी)

मी बुद्धांना अनुसरतो |

मी धम्माला अनुसरतो |

मी संघाला अनुसारतो |

दुसऱ्यांदा मी बुद्धांना अनुसरतो |

दुसऱ्यांदा मी धम्माला अनुसरतो |

दुसऱ्यांदा मी संघाला अनुसरतो |

तिसऱ्यांदा मी बुद्धांना अनुसरतो |

तिसऱ्यांदा मी धम्माला अनुसरतो |

तिसऱ्यांदा मी संघाला अनुसरतो |

पंचशील (पाली)

पाणातिपाता वेरमणि सिक्खापदं समादियामि || १ ||

आदिन्नादाना वेरमणि सिक्खापदं समादियामि || २ ||

कामेसुमिच्छाचारा वेरमणि सिक्खापदं समादियामि || ३ ||

मुसावादा वेरमणि सिक्खापदं समादियामि ||४||

सुरामेरयमज्ज पमादट्ठाणा वेरमणि सिक्खापदं समादियामि ||५||

|| साधू || साधू || साधू ||

पंचशील (मराठी)

मी जीव हिंसेपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते || १ ||

मी चोरीकरण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते || २ ||

मी कामवासनेच्या अनाचारापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते || ३ ||

मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते || ४ ||

मी मद्य तसेच इतर सर्व मोहात पाडणाऱ्या मादक वस्तूंच्या सेवनपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते || ५ ||

|| साधू || साधू || साधू ||

बुद्ध पूजा

पुप्फ पूजा (पाली)

वण्ण–गन्ध–गुणोपेतं, एतं कुसुमसन्तति |

पूजयामि मुनिन्दस्स, सिरिपादोसरोरूहे || १ ||

पुजेमि बुद्धं कुसुमेन नेनं पुञ्ञेन मेत्तेन लभामि मोक्खं |

पुप्फं मिलायति यथा इदं मे, कायो तथा याति विनास भावं || २ ||

पुष्प पूजा (मराठी)

वर्ण, सुगंध आणि सुंदर गुणांनी युक्त अशा पुष्पांनी मी भगवान बुद्धांच्या चरण कमलांची पूजा करतो/करते. || १ ||

ह्या पुष्पांनी श्रद्धा व निष्ठापूर्वक बुद्ध पुजा करण्याच्या या पुण्य प्रतापाने निश्चितच मला निर्वाणाचा साक्षात्कार होईल. जसी ही पुष्पे कोमेजून जातात, तसेच माझे शरीरही विनाशाकडे जाईल. || २ ||

धुप पुजा (पाली)

गंध संभार युतेने, धूपेनाहं सुगंधिनाहं | पुजये पूजनेयंतं, पुजा भाजनं मुत्तमं || १ ||

सब्ब पाप विसुद्धस्स, अनंत गुण धारिनो | नमामि लोकनाथस्स, धूपेमेतेन सादरं || २ ||

धुप पुजा (मराठी)

उत्तम सुगंधाने युक्त अशा धूपाने उत्तम पूजेला पात्र असलेल्या पूज्यनीय भगवान बुद्धांची मी पूजा करतो. || १ ||

जो समस्त पापमळापासून अगदी मुक्त असून परमविशुद्ध व अनंत गुणाने परिपूर्ण आहे. त्या भगवान लोकनाथाची मी आदरपूर्वक या सुगंधित धुपाने पूजा करतो. || २ ||

सुगंधि पूजा (पाली)

सुगंधि–काय वदनं, अनंत–गुण–गंधिना सुगंधिनाहं गंधेनं, पूजयामि तथागतं || १ ||

देसेत्वा पवरं धम्मं, पाप मागंध नासकं सुगंधिनाहं गंधेनं, पूजयामि लोकनायकं || २ ||

सुगंधित पूजा (मराठी)

सुगंधयुक्त शरिर त्याच प्रमाणे सुगंध वदन व अनंत गुण सुगंधाने परिपूर्ण अशा तथागतांची मी पूजा करतो. || १ ||

ज्याच्या अन्मोल अमृतासमान धम्माच्या उपदेशाने पापाचा नाश होतो अशा लोकनायक बुद्धांची सुगंधित सुगंधाने पूजा करतो. || २ ||

प्रदीप पूजा (पाली)

घनसारप्पदिपेन दिपेन, तमधंसिना त्रिलोकदीपं संबुद्ध, पूजयामि तमोनूदं || १ ||

ब्रम्हिंद्र–देवेंद्र–नरिंद्रराजं, बोधिसुबोधि करुणा गुणमं पय्यापदीप जलितो जलंत, वंदामि बुद्धं भवपार तिण्ण || २ ||

प्रदीप पूजा (मराठी)

अंधःकाराचा नाश करणाऱ्या या प्रदीपाने मी अज्ञान अंधःकाराचा नाश करणाऱ्या त्रिलोकप्रदीप भगवान बुद्धांची पूजा करतो. || १ ||

जो ब्रह्माधीपती, देवाधिपती व नरेंद्राप्रति आहे. ज्यानी जगात सर्वश्रेष्ठ ज्ञान संपादिले असून जो करुणादी गुणात अग्र आहे. त्या प्रज्ञाप्रदीप पाजळणाऱ्या, भवसागर पार करून उत्तम निर्वाण स्थळी पोहोचलेल्या, भगवान बुद्धांना मी वंदन करतो. || २ ||

चेतिय पूजा (पाली)

बुद्ध धम्मं च संघं सुगततनुभवा धातुवो धातु गब्बे लंकायं जंबुद्विपे तिदसपुरे नागलोके च धुपे || १ ||

सब्बे बुद्धसं बिंबे संकलदसदीसे केसलोमादिधातुं वंदे सब्बेपि बूद्धं दसबलतनुजं बोधिचेत्यं नमामि || २ ||

वंदामि चेत्यं सब्बंठानेसु पतिटिठतं शारिरिक–धातु महाबोधि बूद्धं–रुपं सकलं सदां || ३ ||

चैत्य पूजा (मराठी)

बुद्ध धम्म व संघाशिवाय जंबुद्विप, लंका, सर्वलोक व नागलोकी याच्या अनंत स्तूपात भगवान बुद्धांचे शरिरावशेष (दंत, अस्थी इ.) स्थापिले आहे. || १ ||

त्या शिवाय सर्व दिशांत असलेल्या बुद्ध प्रतिमा व केश, लोम इत्यादी धातूंचीही मी वंदना करतो. || २ ||

तसेच दहा बुद्धगुणांनी परिपूर्ण असलेल्या भगवान बुद्धांच्या सर्व चैत्यांना मी आदरपूर्वक नमस्कार करतो. || ३ ||

भीम स्मरण (पाली)

सकल विज्जं विधुरञ्ञानं देवरुपं सुजिव्हं |

निमल चक्खुं गंभिर घोसं गौर वण्णं सुकायं |

अभय चित्तं निभय कामं सुरत धम्मं सुपेमं |

विरत रज्जं सुजन नेतं भीमरावं सरामि |

भिमरावं सरामि, भिमरावं सरामि |

भीम स्मरण (मराठी)

सर्वोत्तम विद्यासंपन्न, तीक्ष्ण बुद्धीसंपन्न, दिव्यरुप संपन्न, प्रभावशाली

ध्वनी संपन्न, गौरवर्ण शरीर संपन्न, करुणा मैत्री संपन्न व निर्भयतेने

धम्म कार्याला परिपूर्ण वाहून घेतलेले, जनसेवेसाठी मंत्री पदाचा

त्याग केलेले, जनतेचे श्रेष्ठ नेते, अशा सर्वगुण संपन्न परम पूज्य

भीमरावांचे मी स्मरण करतो/करते

त्रिरत्न वंदना

बुद्ध वंदना (पाली)

इतिपिसो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जाचरण संपन्नो |

सुगतो, लोकवीदु, अनुत्तरो, पुरीस धम्मंसारथि, सत्था देव–मनुस्सानं, बुद्धो भगवाति |

बुद्धं याव जीवितं परियंतं सरणं गच्छामि || १ ||

येच बुद्धा अतीता च, येच बुद्धा अनागता |

पचूपन्नाच ये बुद्धा, अहं वंदामि सब्बदद्ा || २ ||

नत्थि में सरण अञ्ञं, बुद्धो मे सरणं वरं |

एतेन सच्चवज्जेन होतु मे जयमङ्गलं || ३ ||

उत्तमङ्गेन वन्देहं पादपंसुवरुत्तमं |

बुद्धो यो खलितो दोसो, बुद्धो खमतु तं ममं || ४ ||

यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु |

रतनं बुद्धसमं नत्थि, तम्मा सोत्थि भवन्तु मे || ५ ||

यो सन्निसिन्नो वरबोधिमुले, मारं ससेनं महति विजेत्वा |

संबोधिमागच्छि अनंतञाणो, लोकुत्तमो तं पणमामि बुद्धं || ६ ||

बुद्ध वंदना (मराठी)

अर्हत (जीवन मुक्त) सम्यक स्मबुद्ध (संपूर्ण जागृत) विद्या

आचरणांनी युक्त, सुगती ज्याने प्राप्त केलेली आहे, सर्वश्रेष्ठ,

दमनशील पुरुषांचे सारथी व आधार देणारे, देव व मनुष्य यांचे

गुरू असे भगवान बुद्ध आहेत. अशा ह्या बुद्ध भगवंताचे जन्मभर

अनुसरण करण्याचा मी निर्धार करीत आहे. || १ ||

मागे जे बुद्ध होऊन गेलेत, पुढे जे बुद्ध होतील व हल्ली जे बुध्द

आहेत, त्या सर्वांना मी सदासर्वदा वंदन करतो. || २ ||

माझे अन्य कोणतेही शरणस्थान नाही. फक्त बुध्द हेच माझे

शरणस्थान आहे. ह्या सत्य वचनाने माझे जय मंगल होवो. || ३ ||

बुद्धांच्या पवित्र चरणधुळीला नतमस्तक होऊन वंदन करतो.

बुद्धांच्यासंबंधी माझ्या हातून काही दोष घडला असेल, तर त्याबद्दल मला क्षमा असो. || ४ ||

ह्या जगात निरनिराळ्या प्रकारची जी अनेक रत्ने आहेत,

त्यापैकी बुद्धांसमान अन्य कोणतेही रत्न नाही. या सत्य वचनाने माझे कल्याण होवो. || ५ ||

ज्याने बोधीरुक्षाखली बसून माराचा, त्याच्या अफाट सेनेसह पराभव केला,

अनंत ज्ञान प्राप्त करून ज्याने सम्बोधी मिळविली,

अशा सर्व जगात सर्वोत्तम असलेल्या श्रेष्ठ बुद्धाला मी प्रणाम करतो/करते. || ६ ||

धम्म वंदना (पाली)

स्वाक्खातो भगवता धम्मो सन्दिट्ठिको, अकालिको एहिपस्सिको ओपनाय्यिको

पच्चतं वेदीतब्बो वियुहीति धम्मं याव जीविंतं परियंतं सरणं गच्छामि || १ ||

येच धम्मा अतीता च, येच धम्मा अनागता |

पच्चुपन्ना च ये धम्मा, अहं वन्दामि सब्बदा || २ ||

नत्थि मे सरणं अञ्ञं, धम्मो मे सरणं वरं |

एतेन सच्चवज्जेन होतु मे जयमङ्गलं || ३ ||

उत्तमङ्गेन वन्देहं धम्मंच, दुविधंवरं |

धम्मे यो खलितो दोसो, धम्मो खमतु तं ममं || ४ ||

यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु |

रतनं धम्मंसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे || ५ ||

अट्ठंगिको अरियपथो जनानं, मोखप्पवेसा उजुको व मग्गो |

धम्मो अयं सन्तिकरो पणितो, निय्यानिको तं पणमामि धम्मं || ६ ||

धम्म वंदना (मराठी)

भगवंताने ज्या धम्माचा सुंदर उपदेश केला, ज्याचे सत्यत्व येथेच

डोळ्यासमोर पाहता येते, जो धम्म आपले फळ ताबडतोब देतो,

कोनिही ज्याचा अनुभव घ्यावा, जो निर्वाणाकडे घेऊन जातो,

हा सिद्धांत विज्ञानाच्या द्वारे स्वतः अनुभवून पाहता येतो.

अश्या या धम्माचे जन्मभर अनुसरण करण्याचा मी निर्धार करीत आहे. || १ ||

मागे झालेल्या बुद्धाने जो धम्म उपदेशिला व पुढे होणारे बुद्ध जो धम्म सांगतील

व हल्लीच्या बुद्धाने जो धम्म सांगितला आहे, त्या सर्वांना मी सदासर्वदा वंदन करतो. || २ ||

मी दुसऱ्या कोणाला शरण जाणार नाही, माझे अन्य कोणतेही शरणस्थान नाही.

बौद्ध धम्मच माझे दुसरे शरणस्थान आहे. या सत्य वचनाने माझे जय मंगल होवो. || ३ ||

सर्व दृष्टीनी श्रेष्ठ असलेल्या धम्माला नतमस्तक होऊन वंदन करतो,

धम्मासंबंधी माझ्याकडून काही दोष घडला असेल, तर त्याबद्दल मला क्षमा असो. || ४ ||

ह्या जगात जी निरनिराळी अनेक रत्न आहेत, त्यापैकी एकानेही बौद्ध धम्माची बरोबरी

होणार नाही.या सत्य वचनाने माझे कल्याण होवो. || ५ ||

हा बौद्ध धम्म एक असा सरळ मार्ग आहे की, जो शांतीकारक,

उत्तम मार्गाने घेऊन जाणारा, अष्टांगानी युक्त, तसेच लोकांना सुख देणारा आहे. त्या धम्माला मी प्रणाम करतो. || ६ ||

संघ वंदना (पाली)

सुपटिपन्नो भगवतो सावकसंघो, उजुपटिपन्नो भगवतो सावकसंघो,

ञायपटिपन्नो भगवतो सावकसंघो, सामीचिपटिपन्नो भगवतो सावकसंघो,

यदिदं चत्तारि पुरिसयुगानी, अट्ठ पुरिस पुग्गला–एस भगवतो सावकसंघो,

आहुनेय्यो पाहुनेय्यो दक्खिणेय्यो, अञ्जलि–करणीयो, अनुत्तरं पुञ्ञं क्खेतं लोकस्सा ति ।

संघं याव जीवितं परियंतं सरणं गच्छामि ।। १ ।।

ये च संघा अतीता च, ये च संघा अनागता ।

पच्चुपन्ना च ये संघा, अहं वन्दामि सब्बदा ।। २ ।।

नत्थि मे सरणं अञ्ञं, संघो मे सरणं वरं ।

एतेन सच्चवज्जेन होतु मे जयमङ्गलं ।। ३ ।।

उत्तमङ्गेन वन्दे हं संघञ्च तिविधोत्तमं ।

संघे यो खलितो दोसो, संघो खमतु तं ममं ।। ४ ।।

यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु ।

रतनं संघसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे ।। ५ ।।

सङ्घो विसुद्धो वरदक्खिणेय्यो । सन्तिद्रियो सब्बमलप्पहिनो ।

गुणेहि नेकेहि समिद्धिपत्तो । अनासवो तं पणमामि संघं ।। ६ ।।

संघ वंदना (मराठी)

भगवंताचा शिष्यसंघ सन्मार्गावर आरुढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ सरळ मार्गावर आरुढ आहे.

भगवंताचा शिष्यसंघ ज्ञानाच्या मार्गावर आरुढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ उत्तम मार्गावर आरुढ आहे.

भगवंताचा शिष्यसंघ अश्या नररत्नांचा आहे की, ज्यांनी वरील चारी जोड्या व आठ सप्तपदांची प्राप्ती करून घेतली आहे.

हा संघ म्हणजे निमंत्रण देण्यास योग्य, स्वागत करण्यास योग्य, दान देण्यास योग्य आणि जगात सर्वश्रेष्ठ पवित्र क्षेत्रासमान आहे.

असा हा संघ वंदन करण्यास योग्य आहे. अशा या संघाला मी जिवंत असेपर्यंत अनुसरतो. || १ ||

जे भिक्खु संघ होऊन गेले ते, जे भिक्खु संघ हल्ली आहेत ते आणि जे भिक्खु संघ होणार आहेत,

त्या सर्वांना मी सदासर्वदा वंदन करतो/करते. || २ ||

मला दुसरे कोणतेही शरण स्थान नाही, बुद्धांचा शिष्यसंघच माझे

सर्वश्रेष्ठ शरण स्थान आहे. या सत्यवचनाने माझे जयमंगल होवो. || ३ ||

तिन्ही प्रकारांनी श्रेष्ठ असलेल्या या संघाला नतमस्तक होऊन वंदन करतो/करते.

संघासंबंधी जर माझ्याकडून काही दोष घडला असेल, तर मला त्याबद्दल क्षमा असो. || ४ ||

या जगात जी निरनिराळी अनेक रत्न आहेत, त्यापैकी एकानेही संघाची

बरोबरी होणार नाही. या सत्यवचनाने माझे कल्याण होवो. || ५ ||

संघ विशुध्द, दान देण्यास योग्य, शांत इंद्रियांचा, सर्व प्रकारच्या

मळांपासून दोषांपासून अलिप्त, अनेक गुणांनी युक्त, तसाच निष्कलंक

आहे. अशा या संघाला मी प्रणाम करतो/करते. || ६ ||

महामङ्गल सुत्त (पाली)

एवं मे सुतं | एकं समयं भगवा सावत्थियं विहरित जेतवने अनाथपिण्डिकस्स आरामे |

अथ खो अञ्ञतरा देवता अभिक्कन्ताय रत्तिया अभिकन्तवण्णा केवलकप्पं जेतवनं ओभसेत्वा |

येन भगवा तेनुपस्कमि, उपसङ्कत्मित्तवा भगवंन्त अभिवादेत्वा एकमन्तं आठ्ठासि |

एकमन्तं ठ्ठिता खोसा देवता भगवन्त गाथाय अज्झाभासि :-

बहू देवा मनुस्सा च, मग्ङलानि अचिन्तयुं |

आकङखमाना सोत्थानं, ब्रुंहि मग्ङलमुत्तमं || १ ||

असवेनाच बालानं, पण्डितानञ्च सेवना |

पूजा चं पूजानियानं, एतं मग्ङलमुत्तमं || २ ||

पतिरुपदेसवासे च, पुब्बे च कतपुञ्ञता |

अत्तसम्मापणिधि च, एतं मग्ङलमुत्तमं || ३ ||

बाहुसच्च च सिपच्च विनयो च सुसिक्खितो |

सुभासितो च या वाचा, एतं मग्ङलमुत्तमं || ४ ||

माता–पितु उपट्ठानं, पुत्तदारस्स सग्ङहो |

अनाकुला च कम्मन्ता, एतं मग्ङलमुत्तमं || ५ ||

दानं च धम्मचरिया च, यातकानं च सग्ङहो |

अनवज्जानि कम्मानि, एतं मग्ङलमुत्तमं || ६ ||

आरती विरती पापा, मज्जपाना च संयमो |

अप्पमादो च धम्मेसु, एतं मग्ङलमुत्तमं || ७ ||

गारवो च निवातो च सन्तट्ठी च कतयुता |

कालेन धम्मसवणं एतं मग्ङलमुत्तमं || ८ ||

खन्ति च सोवचस्सता, समणानं च दस्सनं |

कालेन धम्मसाकच्छा, एतं मंग्ङलमुत्तमं || ९ ||

तपो च ब्रम्ह्चरियच्च, अरियसच्चान दस्सनं |

निब्बानसच्छिकिरिया च, एतं मग्ङलमुत्तमं || १० ||

फुठ्ठस्स लोकधम्मेहि, चित्तं यस्स न कम्पति |

असोकं विरजं खेमं, एतं मग्ङलमुत्तमं || ११ ||

एतादिसानि कत्वान, सब्बत्थंमपराजिता |

सब्बत्थ, सोत्थि गच्छन्ति, तं तेसं मग्ङलमुत्तमं || १२ ||

महामङ्गल सुत्त (मराठी)

असे मी ऐकले आहे की, एके वेळी भगवान बुद्ध श्रावस्ती येथे जेतवनांत अनाथपिण्डिकाच्या संघारामात राहत होतें. तेव्हा रात्र संपत आली असता,

एक सज्जन व्यक्ती सर्व जेतवन प्रकाशित करुन, भगवंताजवळ आली व भगवंताला वंदन करुन एका बाजूला उभी राहिली. बाजूला उभी राहून ती सत्पुरुष भगवंताला म्हणाली :–

स्वतःचे कल्याण इच्छिणार्या पुष्कळ देवांनी आणि माणसांनी मंगलाविषयी

विचार केला, तेव्हा उत्तम मंगल कोणते ते कोणते ते आपण सांगावे || १ ||

मूर्खाची संगती न करणे, शहाण्या माणसांची संगत करणे व

पूज्य लोकांची पूजा करणे, हे उत्तम मंगल होय. || २ ||

अनुकूल स्थळी वास्तव्य करणे, शुभ गोष्टी संपादन करणे व

आपल्याला सन्मार्गावर लावणे, हे उत्तम मंगल होय. || ३ ||

अंगी बहुश्रुतपणा असणे, कला संपादन करणे, अंगी शिष्ठता

बाळगणे व सुभाषण करणे, हे उत्तम मंगल होय || ४ ||

आई वडिल यांची सेवा करणे, मुलबाळ, बायको यांचा

सांभाळ करणे व उलाढाली न करणे, हे उत्तम मंगल होय. || ५ ||

दान देणे, धम्मचरण, आप्तेष्टांचा आदरसत्कार करणे,

पापकर्मापासून अलिप्त राहणे, हे उत्तम मंगल होय. || ६ ||

काया, वाचा व मनाने अशुभ न करणे, मद्यपान न करणे आणि

धम्म कार्यात तत्पर राहणे, हे उत्तम मंगल होय. || ७ ||

गौरव करणे, नम्रता करणे, संतुष्ट राहणे, केलेले उपकार स्मरणे

आणि योग्य वेळी धम्म श्रवण करणे, हे उत्तम मंगल होय. || ८ ||

क्षमाशील असणे, अंगी लीनता असणे, सज्जनांचे दर्शन घेणे आणि

योग्य वेळी धम्म चर्चा करणे, हे उत्तम मंगल होय. || ९ ||

तप करणे, ब्रम्हचर्याचे पालन, आर्य सत्याचे पालन करणे आणि

निर्वाणाचा साक्षात्कार घेणे, हे उत्तम मंगल होय. || १० ||

आठ प्रकारच्या लोक धम्माने मनाला विचलित होउ न देणे,

जसे शोकरहित राहणे, निर्मल आणि निर्भय राहने, हे उत्तम मंगल होय. || ११ ||

येणेप्रमाणे वर्तन करूने, सर्वत्र अपराजित राहने, लोक कल्याणाला प्राप्त करने

इत्यादी हे त्यांच्या सुज्ञ (श्रेष्ठ पुरुष व मनुष्याकरिता) उत्तम मंगल होय. || १२ ||

जयमंड्गल अठ्ठगाथा (पाली)

बाहुं सहस्सभिनिम्मित सावुधन्तुं, गिरीमेखलं उदित घोरं–ससेन–मारं

दानादि धम्मविधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || १ ||

मारातिरेक–मभियुज्झित सब्बरंती, घोरमपना लवक मक्ख मथंद्ध यक्ख |

खन्ती सुदन्तविधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || २ ||

नालागिरि गजवरं अतिमत्तभूतं, दावग्गि चक्कमसनीव सुदारुणन्तं

मेत्तम्बुसेक विधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || ३ ||

उक्खित्त खग्गमतिहत्थ सुदारुणन्तं, धावन्ति योजनपंथगुलि–मालवन्तं |

इध्दीभिसङ्गखत मनो जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || ४ ||

कत्वान कठ्ठमुदरेंव इवगब्भिनीया, चिञ्चाय दुठ्ठवचन जनकाय मज्झे,

सन्तेन सोम विधिना जितवा मुनिन्दो तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || ५ ||

सच्चं विहाय–मतिसच्चकं वादकेन्तु वादाभिरोपितमनं अतिअन्धभूतं

पञ्ञापदीजलितो जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || ६ ||

नन्दो पनन्द–भुजंग विविधं महिद्धि, पुत्तेन थेर भुजगेन दमापयन्तो |

इदूपदेश विधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || ७ ||

दुग्गहदिठ्ठी भुगजेन सुदठ्ठ हत्थं, ब्रम्हंविसुद्धि जुतिमिद्धि बकाभिधानं |

ञाणागदेन विधिना जितवा मुनिन्दो, तं तेजसा भवतु ते जयमंडलानि || ८ ||

एतापि बुद्ध जयमंड्गल अठ्ठगाथा, यो वाचकोदिनदिने सरते मनन्दि |

हित्वाननेक विविधांनी चुपछद्दवानि मोक्खं सुखं अंधिगमेय्य नरोसपञ्ञो || ९ ||

जयमंङ्गल अठ्ठगाथा (मराठी)

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, हत्यार धारण करुन सहस्रबाहू गिरीमेखाला, हत्तीवर आरुढ झालेल्या,

अत्यंत भयानक सेनेसह आलेल्या माराला, आपल्या दान आदि धम्म बलाने जिंकले.

त्या भगवान बुद्धांच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || १ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, माराव्यतिरिक्त समस्त रात्र संग्राम करणाऱ्या घोर, दुर्धर आणि निष्ठूर–हृदयी अशा

आलवक नामक यक्षाला, शांती आणि संयम बलाने जिंकले, त्या भगवान बुद्धांच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || २ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, अग्नीचक्र आणि विजेप्रमाणे अत्यंत भयानक आणि मदोन्मत अशा नालागिरी हत्तीला

आपल्या मैत्रीरुपी पावसाने जिंकले, त्या बुद्धाच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || ३ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, हातात तलवार घेऊन एक योजनेपर्यंत न थांबता धावणाऱ्या अत्यंत भयानक

अंगुलीमालाला, आपल्या रिद्धी बलाने जिंकले, त्या भगवान बुद्धाच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || ४ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, पोटावर काष्ट बांधून गर्भवती सारखे आपले पोट मोठे झाल्याचे ढोंग केलेल्या

त्या चिंचा नामक स्त्रीला (जी बुद्धाला कलंक लावू पाहत होती) आपल्या शांत आणि सौम्य बलानो जिंकले,

त्या बुद्धाच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || ५ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, सत्य सोडलेल्या व असत्य वादाचा पोषक, अभिमानी वादविवादात पारंगत व

अहंकाराने अंध झालेल्या सच्चक नामक परिव्राजकाला प्रज्ञा–दीपाने जिंकले

त्या बुद्धाच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || ६ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, विविध ऋद्धी संपन्न नंदोपनंद नामक भुजंगाला

आपल्या महामौग्दल्यायन शिष्याकडून ऋद्धी, शक्ती आणि उपदेशाच्या बलानो जिंकले,

त्या बुद्धाच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || ७ ||

ज्या मुनिन्द्राने–बुद्धाने, भयंकर मिथ्थादृष्टीरुपी सापाने डसलेल्या विशुद्ध ज्योती आणि

ऋद्धी शक्ती संपन्न बक नामक ब्रम्हज्ञान्याला ज्ञानरुपी औषध देऊन जिंकले,

त्या बुद्धाच्या प्रतापाने तुमचे कल्याण होवो. ||८||

जो कोणी पाठक हया बुध्दाच्या आठ मंगल गाथा दक्षतापूर्वक दररोज म्हणेल तो

बुध्दिमान पुरुष, स्त्री नाना प्रकारच्या उपद्रवापासून मुक्त होऊन सुख प्राप्त करील. ||९||

प्रतिज्ञा (पाली)

अत्थेच, धम्मेच, कामेच, नाथीचरामी |

अत्थेच, धम्मेच, कामेच, नाथीचरामी |

अत्थेच, धम्मेच, कामेच, नाथीचरामी |

प्रतिज्ञा (मराठी)

मी धार्मिक, समाजिक, वैवाहिक जीवनातील नियम कधीही मोडणार नाही.

मी धार्मिक, समाजिक, वैवाहिक जीवनातील नियम कधीही मोडणार नाही.

मी धार्मिक, समाजिक, वैवाहिक जीवनातील नियम कधीही मोडणार नाही.

वराची कर्तव्ये :–

माझी भगवान बुद्धांवर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरावर श्रद्धा आहे. माझा त्यांच्यावर विश्वास आहे. या समारंभात उपस्थित असलेल्या व्यक्तींना मी साक्षीदार म्हणून स्वीकार करतो व त्यांच्यासमोर पाच शपथा घेतो व त्या शपथांचे आयुष्यभर पालन करीन असे वचन देतो.

१. सन्माननाय :– मी माझ्या पत्नीचा सन्मान करीन.

२. अवमाननाय :– मी माझ्या पत्नीचा अपमान करणार नाही.

३. अनितिचरियाय :– मी अनिती व अणाचारापासून अलिप्त राहीन.

४. इस्सरीय वोस्सगेन :– मी माझ्या पत्नीला अन्न धान्याने संतुष्ट ठेवीन.

५. अलंकारानू पदानेच :– मी माझ्या पत्नीला अलंकारादी आभूषणांनी संतुष्ट ठेवीन. तसेंच मी माझ्या पत्नीला सुखात तसेंच दुखात समानतेने वागवेन.

मी पुन्हा वचन देतो की. मी आज घेतलेल्या पाचही प्रतिज्ञानचे प्रामाणिकपणे पालन करीन.

वधूची कर्तव्ये :–

माझी भगवान बुद्धांवर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरावर श्रद्धा आहे. माझा त्यांच्यावर विश्वास आहे. या समारंभात उपस्थित असलेल्या व्यक्तींना मी साक्षीदार म्हणून स्वीकार करते व त्यांच्यासमोर पाच शपथा घेते व त्या शपथांचे आयुष्यभर पालन करीन असे वचन देते.

१. सुसंविहिता कम्मणात :– मी माझ्या घरातील सर्व मंडळींची उत्तम व्यवस्था ठेवेन.

२. येसम संघहीत योजना :– मी माझ्या परिवाराशी सौजन्याने वागेन.

३. अनितिचारिनिय :– मी अनिती व अणाचारापासून अलिप्त राहीन.

४. सब्बतन अनुरक्खनं :– मी माझ्या पतीच्या संपत्तीचे रक्षण करीन.

५. सब्बकीच्चेसु :– मी घरकामात आळस न करता दक्ष राहीन.

मी पुन्हा वचन देते की. मी आज घेतलेल्या पाचही प्रतिज्ञानचे प्रामाणिकपणे पालन करीन.

यानंतर प्रवेशाच्या रिवाजानुसार पती पत्नीला अंगठी घालतो किंवा भांगेत कुंकू लावतो. त्यानंतर बौद्धाचार्य महामंगल गाथेद्वारा दोघांना आशीर्वाद देऊन दोघांच्या हातात पवित्र धागा बांधतो आणि या गाथेचे पठण करून विवाह संस्कार संपन्न करतो.

पाली

इच्छितं पत्थितं तुय्हं खीप्पमेवसमिज्झतु |

सब्बे पुरेन्तु चित्तसंकप्पा चन्दोपन्नरसो यथा || १ ||

मराठी

तुमच्या इच्छित आणि अपेक्षित सर्व वस्तू तुम्हाला शीघ्र मिळोत.

तुमचे सर्व संकल्प पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्ण होवोत. || १ ||

सब्ब सुख गाथा (पाली)

सब्बे सत्ता सुखी होन्तू, सब्बे होन्तू चं खेमिनो |

सब्बे भद्रानि पस्सन्तु, माकञ्चि दुक्खमागमा || १ ||

यानिध भूतानि समागतानि, भुम्मा निवाया निव अन्तलिखे

सब्बेव भूता सुमना भवन्तू अथो पि सकच्च सुणन्तू भासितं || २ ||

तस्मा हि भुता निसामेथ सब्बे, मेतं करोथ मानूसिया पजाय |

दिवाच रत्तोच हरन्ति ये बलि, तस्माहिने रक्खथ अप्पमत्ता || ३ ||

सर्व सुख गाथा (मराठी)

सारे प्राणीमात्र सुखी होवोत, सर्वांचे कल्याण होवो,

सर्वांना हिताचा मार्ग सापडो, कोणालाही दुःख न होवो. || १ ||

भूतळावरील आणि अवकाशातील जेवढे प्राणीमात्र येथे उपस्थित आहेत,

ते सर्व प्राणिमात्र समाधानी होवोत आणि हे सुभाषित लक्ष देऊन ऐकोत. || २ ||

म्हणून सर्व प्राणीमात्रांनो ऐका, मानवी प्रजेवर प्रेम करा,

जे तुमच्या हिताकरिता अहोरात्र झटतात, त्यांचे जागरूकपणे रक्षण करा. || ३ ||

धम्म पालन गाथा (पाली)

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा |

सचितपरियोदपनं, एतं बुद्धान सासनं || १ ||

धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे |

धम्मचारी सुखं संति अस्मिं लोके परम्हिचं || २ ||

न तावता धम्मधरो, यावता बहु भासति |

यो च अप्पम्पि सुत्वान, धम्मं कायेन पस्सति ।

स वे धम्मधरो होति, तो धम्मं नप्पमज्जति ।। ३ ।।

धम्म पालन गाथा (मराठी)

सर्व दूराचरापासून अलिप्त राहणे, कुशल कर्म संपादण करणे, कोणतेही पाप

न करता, पुण्य संपादने, स्वचिताची शुद्धी करणे, हे बुद्धांचे सांगणे. ।। १ ।।

चांगल्या प्रकारे धम्म आचरावा, वाईट प्रकारे नाही ।

या धम्माचे आचरण करणारा लोक–परलोकात सुखाने झोप घेतो. ।। २ ।।

पुष्कळ बोलण्याने धम्मधर होत नसतो. जे धम्माचे प्रत्यक्ष कायेने अनुकरण

करतात व जे धम्माची अवहेलना करीत नाही, तेच सर्व धम्मधर होतात. ।। ३ ।।

आशिर्वाद व शुभेच्छा

आशिर्वाद (पाली)

भवतू सब्ब मङगलं रक्खन्तु सब्ब देवता ।

सब्ब बुध्दानुभावेन सदा सोत्थि भवंतु ते ।। १ ।।

भवतू सब्ब मङगलं रक्खन्तु सब्ब देवता ।

सब्ब धम्मानुभावेन सदा सोत्थि भवंतू ते ।। २ ।।

भवतू सब्ब मङगलं रक्खन्तु सब्ब देवता ।

सब्ब संघानुभावेन सदा सोत्थि भवंतू ते ।। ३ ।।

आशिर्वाद (मराठी)

तुमचे सर्व मंगल होवो, सर्व सत्पुरुष तुमचे रक्षण करोत,

बुद्धांच्या सर्व प्रतापाने तुमचे कल्याण होवो. ।। १ ।।

तुमचे सर्व मंगल होवो, सर्व सत्पुरुष तुमचे रक्षण करोत,

धम्माच्या सर्व प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || २ ||

तुमचे सर्व मंगल होवो, सर्व सत्पुरुष तुमचे रक्षण करोत,

संघाच्या सर्व प्रतापाने तुमचे कल्याण होवो. || ३ ||

शुभेच्छा (पाली)

इच्छितं पत्थितं तुय्हं खीप्पमेवसमिज्झतु |

सब्बे पुरेन्तु चित्तसंकप्पा चन्दोपन्नरसो यथा || १ ||

आयुरारोग्यं सम्पति सब्ब सम्पती मेवच |

ततो निब्बाण सम्पति इमिना ते समिज्झतु || २ ||

शुभेच्छा (मराठी)

तुमच्या इच्छित आणि अपेक्षित सर्व वस्तू तुम्हाला शीघ्र मिळोत.

तुमचे सर्व संकल्प पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्ण होवोत. || १ ||

तुम्हाला दीर्घायुष्य,आरोग्य आणि सर्व संपत्तीचा लाभ होवो,

त्याचप्रमाणे निर्वाण संपत्ती प्राप्त होवो. || २ ||

समापन गाथा (पाली)

सब्बे सत्ता सुखी होन्तू, सब्बे होन्तू चं खेमिनो |

सब्बे भद्रानि पस्सन्तु, माकञ्चि दुक्खमागमा || १ ||

समापन गाथा (मराठी)

सारे प्राणीमात्र सुखी होवोत, सर्वांचे कल्याण होवो,

सर्वांना हिताचा मार्ग सापडो, कोणालाही दुःख न होवो. || १ ||

मंत्र (पाली)

ॐ मणि पद्मे हुं |

ॐ मणि पद्मे हुं |

ॐ मणि पद्मे हुं |

मंत्र (मराठी)

विश्व कमळस्थ बुद्धाला प्रणाम असो !

विश्व कमळस्थ बुद्धाला प्रणाम असो !

विश्व कमळस्थ बुद्धाला प्रणाम असो !